
REVIEWS OF LITERATURE
ISSN: 2347-2723
IMPACT FACTOR : 3.3754(UIF)
VOLUME - 5 | ISSUE - 6 | JANUARY - 2018

# बसवेश्वरांचे राजकीय विचार

डॉ. सुहास रंगनाथ मोराळे[1] , निंगप्पा सिद्राम सोमगोंडे[2]
[1]राज्यशास्त्र विभाग प्रमुख, स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड माजी संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
[2]राज्यशास्त्र विभाग प्रमुख , जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद.

**प्रास्ताविक:**

धर्म आणि राजकारण यांचा परस्पर संबंध आपणास सर्वत्र आढळतो. प्राचीन काळी धर्माचा प्रभाव राजकारणावर असल्याने धर्माचे नियंत्रण आणि राजकीय व्यवहारावर असल्याचे इतिहास सांगतो. प्राचीन काळी राज्यापेक्षा धर्म अधिक सुसंघटित स्वरूपात अस्तित्वात होता आणि धर्माला परमेश्वरीय सत्तेचे अधिष्ठान असल्याचे सर्वांनी मान्य केलेले असल्याने धर्म राज्यापेक्षा श्रेष्ठ आहे. असा विचार सर्वत्र रूढ होता. धर्म श्रेष्ठ की



राज्य व राज्याची सत्ता श्रेष्ठ असा संघर्षात्मक इतिहास पाश्चात्त्य देशात घडून गेलेला आहे आणि त्याचाच परिपाक म्हणून धर्मातील किंवा निधर्मी Seculer राज्याची संकल्पना निर्माण झाली असल्याचे दिसते. याबाबतीत भारताचा प्राचीन इतिहास पाश्चात्यांच्या इतिहासापेक्षा वेगळा आहे. तो अधिक धार्मिक असून, अभावानेच राजकीय आहे. कौरव-पांडवाचा सत्तासंघर्ष आणि त्यांच्यामधील महाभारत धर्मासाठीचे युद्ध आहे. वास्तविक सत्ताप्राप्ती हा राजकारणाचा स्थायीभाव असूनही आणि युद्ध सत्ताप्राप्तीचे साधन म्हणून मान्य असूनही महाभारताला धर्मयुद्ध असे म्हटले गेले.

**उद्देश:**

महात्मा बसवेश्वरांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करणे.
महात्मा बसवेश्वरांच्या राजकीय विचारांचा समाजावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत शोध निबधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला असून द्वितीयक साधनांचा आणि विद्वानांच्या मतांचा आधार घेण्यात आला आहे.

**मर्यादा:**

प्रस्तुत शोध निबंधाची मर्यादा महात्मा बसवेश्वरांचे राजकीय क्षेत्रातील कामगिरीपूर्तीच मर्यादित आहे.

**व्याप्ती:**

प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती महात्मा बसवेश्वरांचे राजकीय विचार आहे.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad



115

**...र्म आणि राजकारणः**

बौध्द धर्माला राजकीय आश्रय मिळाला. म्हणजे राजाने स्वीकारलेला धर्म आणि त्याने धर्मप्रसारासाठी केलेले प्रयत्न या अर्थाने ...जकीय आश्रय ही शब्दसंकल्पना मान्य आहे. जेव्हा एखादा समुदाय सहअस्तित्वाच्या निकडीमधून एकात्म भावनेने स्वत:चे राजकीय संघटन ...डवून आणतो आणि स्वतंत्र, निरंकुश, संघटित, राजकीय समाज म्हणून उदयास येतो तेव्हा तो राज्य म्हणून मान्यता पावतो. या सिद्धांतानुसार ...डून येणारी राजकीय उत्क्रांत प्रक्रिया भारतात आपणास क्वचितच आढळते असे म्हणणे धाडसाचे आहे किंवा ते विवेकाला धरून नाही, अशी ...का मान्य करण्यासारखे आहे.

भारतीय इतिहास हा मुख्यत: राजा-राजा, व्यक्तीमधील सत्तासंघर्षाचा, राज्यविस्ताराचा आणि प्रसंगी धर्मासाठी युद्धाचा इतिहास आहे. ...ो भारतीय जनतेचा आणि जनसामान्यांचा इतिहास असा वेगळ्या ढाचाचा इतिहास नव्हे. व्यक्ती, व्यक्तीस्वातंत्र्याचा लढा, राज्य आणि व्यक्ती ... समाज, त्यांच्यामधील परस्पर संबंध, लोकांचा स्वत:च्या न्यायहक्कासाठीचा संघर्ष या अंगाने भारतीय इतिहास हा नगण्यच आहे. किंबहुना ...्रिटिशाच्या आगमनापर्यंत आणि त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाची भारतीय माणसाला ओळख होईपर्यंत भारतीय माणूस विशुद्ध राजकीय ऱ ...नापासून दूर होता. आधुनिक लोकशाही शासन प्रकारात अनिवार्य असणारा संघर्ष राजकारणातील आणि सत्तेमधील स्पर्शलेला नव्हता. काही ...ंशी या वास्तवास अपवाद म्हणून महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंटप या प्रयोगाचा विचार करावा लागेल?

बसवेश्वरांच्या नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आलेली"[३]" अनुभव मंटप ही संस्था सर्वार्थाने क्रियाशील, समाजाला मार्गदर्शन ...रणारी, जीवन तत्त्वज्ञान सांगणारी संस्था होती. अनुभव मंटपाची निर्मिती आणि तिचे उद्दिष्ट आणि कार्यपद्धती ही बसवेश्वरांच्या वैचारिक ...रिपक्वतेची उत्पत्ती आहे. विरशैवाच्या धर्मजीवनाला, संस्कृतीला, तत्त्वज्ञानाला खऱ्या अर्थाने निश्चित आधार देऊ पाहणारी, जीवनाची ...्यापकता सांगणारी व सिद्ध करणारी ती संस्था होती. निखळ मानवी मूल्यावर आधारलेला नवसमाज निर्माण करण्याच्या ध्येयानेच ...सवेश्वरांनी या संस्थेची उभारणी केली. या संदर्भात पाटील एम.पी. म्हणतात- 'Mahatma Basveshwara established the ...eligious institution named "Shivanubhav Mantap" which was based on the social principles of non-...iolent, truth love equality and fraternity in order to spread the religious of humanity'.

धर्म आणि राजकारण यांच्यात आज फरक केला जात आहे. तरी या दोहोमध्ये घनिष्ठ संबंध असतो. धर्म आणि राजकारण ...ांच्यातील संबंधाला प्राचीन काळापासून आजतागायत विशेष महत्व लाभलेले होते. मध्ययुगीन काळात सामान्य माणूस देव आणि दैव यांच्या ...ेऱ्यात सापडलेला होता. म्हणूनच मध्ययुगाला 'भक्तियुग' असे म्हटले जाते. डॉ.अंबादास माडगुळकर यांच्या मते, "मध्ययुगीन काळातील ...ोकांच्या दैनंदिन व्यवहारावर देखील धर्माचा जबरदस्त प्रभाव पडलेला होता." बसवेश्वरांनी आपली कारकीर्द अशा वेळी गाजविली की जेव्हा ...र्म हा समाजजीवनातील एक महत्वाचा प्रभावी घटक होता. वैदिक धर्मातील आणि समाजव्यवस्थेतील परंपरागत आनिष्ठरूढी विरूध्द बंड ...ुकारून बसवेश्वरांनी धर्म समाज आणि राजकारण यांना एक नवी दिशा दिली. धर्माकडे पाठ फिरवून बसवेश्वरांनी काही समाजप्रबोधन केले ...असते तर ते लोकांना कदाचित रूचले नसते. धर्माधिष्ठित मानवी मूल्यांचा बसवेश्वरांनी केलेला प्रचार-प्रसार उध्दार हा स्वाभाविक ठरतो. धर्म ...आणि राजकारण यांच्यातील श्रेष्ठत्वाबाबत अनेक देशात वाद गाजला आहे. आज ज्या समाजाच्या सक्रिय राजकीय सहभाग आणि प्रभाव ...अधिक असतो, त्या समाजाच्या मागण्याची आणि समस्यांची तातडीने पूर्तता होत असते. तेव्हा धर्म, समाज आणि राजकारण ही परस्पर ...ंबंधीत अशी एक समाजव्यवस्था असते. तथापि धर्मनिरपेक्षता या तत्वामुळे धर्म आणि राजकारण यांच्यात फारकत होऊ लागली आहे.

**...सवेश्वर एक राजनीतिज्ञः**

महात्मा बसवेश्वर हे समन्वयवादी राजनीतिज्ञ होते. त्यांनी राजकारण व धर्म, राजकारण व समाज, राजकारण व प्रशासन, राजकारण ... समाजहितरक्षण यांचा समन्वय साधलेला आहे. समन्वयता व सामान्यपणा हे बसवेश्वरांच्या राजकीय तत्वज्ञानाचे प्रमुख वैशिष्टे होय. डॉ. ...स.एम. हुनशाळ म्हणतात, "धर्मशास्त्र आणि समाजशास्त्र यांचा सहप्रवास हे वीरशैव चळवळीच्या यशाचे गुपित होय. धर्मिक उन्नतीबरोबर ...ामाजिक विकास देखील होत गेला.

**...त्य, अहिंसा, प्रेम, समता व बंधुत्व या मुल्यांवर आधारित अनुभव मंटपाची स्थापनाः**

अहिंसा, सत्य, प्रेम, समता, बंधुत्व या मूल्यांवर आधारित असलेली मानवतेच्या धर्मप्रसारासाठी कार्य करणारी धर्म संस्था महात्मा ...सवेश्वरांनी स्थापन केली. अनुभव मंटपाची स्थापना करण्यामध्ये केवळ धर्मप्रसार हा हेतू नव्हता. वीरशैव धर्माची जगाला ओळख करून देणे ...शिवाय एक विवेकी, आदर्श समतेच्या मूल्यांवर आधारित असणारा समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारी वैचारिक प्रक्रिया घडवून ...आणणे हा मुख्य: हेतू या संस्थेच्या स्थापनेमागे होता. अनुभव मंटपामधील सदस्यांची संख्या आणि नावाची यादी पाहिल्यास त्या संस्थेचे स्वरूप ...आणि त्या संस्थेमध्ये घडणाऱ्या चर्चेचे मूल्य व उंची आपल्या लक्षात येऊ शकेल. मोळगी मारय्या- काश्मीरचे राजे, त्यांची पत्नी महादेवी, ...अल्लमप्रभू, अक्कमहादेवी, ओरिसाचे मरूळ शंकरदेव अशा अनेक नामवंत व ज्ञानी व्यक्ती अनुभव मंटपाच्या सदस्य व्यक्ती होत्या. ...भारताच्या विविध ठिकाणांहून अनेक लोक अनुभव मंटपाकडे आकर्षित झालेले होते. थोडक्या काळातच अनुभव मंटपाची प्रसिद्धी देशात



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

ूर ठिकाणी झाली. या संदर्भात माता महादेवी म्हणतात- 'Within a Short span of time, the academy become llknown as far as the four corners of India, seekers of truth from kashmir to Kalyan and Afganistan to ngal flocked towards Kalyan'.

सत्याच्या शोधार्थ देशाच्या विविध ठिकाणांवरून अनेक नामवंत व्यक्ती कल्याणकडे येत असत.

अनुभव मंटपाचा उल्लेख अनेक विचारवंतांनी अनेक पद्धतीने केलेला आहे."[५]" A Religion Parliament धर्मसभा, cademy विद्यापीठ, Assembly धर्मविधी सभा, Open University मुक्त विद्यापीठ अशा विविध संबोधनांनी या अनुभव मंटपाचा लेख केला आहे. A Religion parliament धर्मसभा म्हणून अनुभव मंटपाचा उल्लेख अनेक दृष्टींनी योग्य आहे. Parliament या दाचा अर्थ A place where a discussion regarding state affairs- text place. राज्याच्या व्यवहारासंबंधी ज्या ठिकाणी चर्चा ते ते ठिकाण. या अर्थाने अनुभव मंटप ही एक धर्मसभा होती. जेथे नि:संशय धर्मविषयक विचारांना मुक्तद्वार होते. अनुभव मंटपात ७७० स्य होते त्यात ७०० पुरूष आणि ७० महिला होत्या.

अनुभव मंटपाचे स्वरूप केवळ धार्मिक नाही. केवळ तो धर्म संसार नाही. तेथे चर्चेला येणारे विषय हे अनेकविध स्वरूपाचे होते. टुंबिक विषय, सामाजिक, आर्थिक स्वरूपाच्या प्रश्नाविषयीची चर्चा, त्यामधील अनेकांचा सहभाग आणि विविध प्रश्नांच्या संदर्भात घेतलेले र्णय हे लोकशिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. वस्तुत: विविध सामाजिक आणि राजकीय उपक्रमाच्या दृष्टीने आवश्यक असलेली माजीकीकरणाची प्रक्रिया अनुभव मंटपामध्ये घडणाऱ्या चर्चेच्या माध्यमाद्वारे साध्य होऊ घातलेली होती. हा वस्तुत: सामाजिक लोकशाहीचा स्तुनिष्ठ प्रयोग होता. या प्रयोगामधून लोकशाही राज्याचा ध्येयवाद रुजू घालण्याचा व यशस्वी करण्याचा प्रयत्न होऊ पाहत होता. बसवेश्वरांना ोकशाही शासन Democrate Govt. आणि लोकशाही राज्य Democrate State कितपत अभिप्रेत होते हे सांगणे कठीण आहे. परंतु श्चितच त्यांना लोकशाही समाजाची संकल्पना अभिप्रेत होती आणि त्या समाजाचे स्पष्ट चित्र पण त्यांच्यासमोर होते. लोकशाही राजकीय वस्थेच्या माध्यमातून साध्य केले जाणारे सामाजिक लोकशाहीचे उद्दिष्ट हे आजच्या लोकशाहीचे अंगभूत उद्दिष्ट व कार्य आहे. बसवेश्वरांनी डविलेले सामाजिक परिवर्तनाचे व क्रांतीचे उद्दिष्ट राजकीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी आवश्यक असणारी पूर्वतयारी आहे. हे लक्षात तल्यास बसवेश्वरांच्या अनुभव मंटपाच्या कार्याची दिशा आणि महत्व लक्षात येते.

अनुभव मंटपामधील आध्यात्मिक चर्चा आणि इतर धर्माबाबत घडणारे परिसंवाद मोगल सम्राट अकबराच्या दरबारात घडणाऱ्या र्मविषयक चर्चेची आणि ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटोच्या अकॅडमीमधील चर्चेची आठवण करून देतात. अकबराचा 'ऐने अकबरी' आणि प्लेटोचा Republic' हे ग्रंथ वस्तुत: तत्कालीन विचारवंतांनी व्यक्त केलेला विचार ऐवज आहे. अनुभव मंटपामधील तत्व मीमांसा ही अधिक गहन, ढ नैतिक आहे. या संदर्भात माता महादेवी म्हणतात. 'Anubhav Mantap was not mearly a thinking place like Plato's cademy, nor it was like Akabar's Din-E-ilahi, it was more a servieing centre of moral people, An orgnisation of delightful people, inspiring centre of social workers and a original centre of social efarmation of all world'."[६]" अनुभव मंटप हे केवळ प्लेटोच्या अकॅडमीसारखे केंद्र नव्हते किंवा अकबराच्या दिन-ए-इलाही सारखी र्मसभा नव्हती तर नैतिकता व चारित्र्यसंपन्न व्यक्तीचे, समाजसेवकाचे, समाजसुधारकाचे प्रेरणा केंद्र होते.

महात्मा बसवेश्वरांनी आपली स्वतंत्र राजकीय विचारसरणी मांडलेली नाही. किंबहुना ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी या देशात विशुद्ध राजकीय स्वरूपाचा विचार व सिद्धांत कोणत्याही विचारवंताने मांडलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी धर्माच्या अनुषंगाने मांडलेला विचार राजकीय अर्थाने स्वीकारल्यास आपणास त्यांच्या विचाराचे स्वरूप लक्षात येऊ शकते. बसवेश्वरांचा कालखंड हा १२ व्या शतकाचा. कल्याण येथील चालुक्य राजघराण्याचा राजा बिज्जळाने चालुक्य राजा तैलप तिसऱ्यानंतर कल्याण राजसिंहासनाचा ताबा घेतलेला होता. राजकीय सत्तेमध्ये होत गेलेले हे स्थित्यंतर आणि त्याच वेळेस बसवेश्वरांनी उभी केलेली सामाजिक परिवर्तनाची चळवळ या लक्षात घेण्यासारख्या घटना आहेत. सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी करण्यासाठी ज्या मानवतावादी मूल्यांचा स्वीकार व आधार बसवेश्वरांनी घेतला ती सर्वच्या सर्वच व्यवस्था आणि संस्थाच्या मूलभूत उद्दिष्टाशी संलग्न असतात. किंबहुना ती असावीच लागतात. कारण, सर्वच संस्थांची उत्पत्ती व निर्मिती मानवी कल्याणासाठी केलेली असते.

**निष्कर्ष:**

राजकीय विचारप्रणाली आधुनिक राजकारणामध्ये देखील नवचैतन्य निर्माण करू शकते, धर्माचे लोकशाहीकरण आणि कर्मकांडांच्या शृखंलातून धर्माची मुक्तता हा अनुभव मंटपाचा मुख्य उद्देश होता.

**संदर्भ:**


१) डॉ. सूर्यकांत घुगरे:- राजनीतिज्ञ महात्मा बसवेश्वर पान नं. २५.

२) प्रा. डॉ. प्रभाकर पां. पाठक:- चेतनाचिंतामणी श्री बसवेश्वर पान नं. ०५.


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

VOLUME - 5 | ISSUE - 6 | JANUARY - 2018

३) Dr. M. R. Basavraj:- Basaveshwara His life, Vision and Work. Someshwar Publications Dharwad. First Adition. Page No.१०९.
४) Dr. Suryakant B. Ghugare: - Veerashaivism in India. Page No. २३९.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad